PC-3 Data- D/Circular (vikas)

# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

क्र. संलग्नता/आयसीसी/(२०२५—२६)/ १३ /२०२५

विषयः—शैक्षणिक वर्ष २०२४—२५ चा 'महाविद्यालय विकास समितीचा' (CDC) वार्षिक अहवालाबाबत..

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संस्थाचे संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९७ (५) (द) नुसार दिनांक ३० जून रोजी संपणाऱ्या वर्षासाठी समितीने केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल तयार करुन महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास व विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.**

या अनुषंगाने ज्या महाविद्यालयांनी अद्याप **"शैक्षणिक वर्ष २०२४—२५ चा 'महाविद्यालय विकास समिती'चा वार्षिक अहवाल"** विद्यापीठास सादर केला नाही, अशा महाविद्यालयांनी **'महाविद्यालय विकास समिती'चा वार्षिक अहवाल** महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई येथे शनिवार दिनांक १९ जुलै, २०२५ पर्यन्त सादर करण्यात यावा. **(ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२४—२५ चा 'महाविद्यालय विकास समिती'चा वार्षिक अहवाल" विद्यापीठास सादर केला असेल त्या महाविद्यालयांनी पुन्हा सादर करू नये)**

**ज्या महाविद्यालयांनी अद्यापपर्यत सदर बाबतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही अशा महाविद्यालयाबाबत भविष्यात विद्यापीठाने केलेल्या कारवाईस महाविद्यालय जबाबदार राहिल, यांची कृपया नोंद घ्यावी.**

ठिकाण : मुंबई—४०० ०३२
दिनांक : ९ जुलै,२०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रतिः—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक.